Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 392– 396

DOI: 10.5281/zenodo.10129733

Original Research Article

# महात्मा गांधीजी आणि अस्पृश्यता निर्मूलन एक अभ्यास

देवकत्ते शिवाजी रामराव[1], डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे[2]

[1]संशोधक विद्यार्थी, सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा. रा. ती. म. वी. नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, नांदेड

[2]सहयोगी प्राध्यापक तथा विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय हाडोळती ता. अहमदपूर जि. लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: [1]shivajidevkatte@gmail.com; [2]rpingle77@gmail.com

Received: 08 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## गोषवारा

गांधीजींनी अस्पृश्यतेच्या प्रश्नांवर अनेक लेख लिहिले. धर्म, वर्ण, जात आणि अस्पृश्यता यासंबंधीचे गांधीजींचे विचार हे त्यांचे निरिक्षण, अभ्यास आणि चिंतनातून विकसित होते गेले. त्यांचा उद्देश सवर्ण हिंदुचे मतपरिवर्तन करण्याचा होता. गांधीजी एका बाजूला अस्पृश्यांच्या प्रति सवर्ण हिंदूंनी आपला दृष्टीकोन बदलला पाहिजे असे सांगत, तर दुसऱ्या बाजूला सवर्ण हिंदूंच्या दृष्टिकोनात बदल होईपर्यंत अस्पृश्यांना संयम पाळण्यास सांगत होते. गांधींनी अस्पृश्यता आणि चातुर्वर्ण्य याबाबत सांगितलेली मते यांच्याकडे जर आजच्या परिस्थितीच्या दृष्टीने पाहिले तर चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि अस्पृश्यता अतार्किक आणि अवैज्ञानिक विभाजनकारी व्यवस्था आहे, असे विवेकी विचार करणारी व्यक्ती म्हणेल, मात्र अनेकांना या व्यवस्थेत काही आक्षेप आहे, असे वाटत नाही. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी ३०-४० वर्षामधील ज्या राष्ट्रीय नेत्यांची नावे घेतली जातात त्यामध्ये महात्मा गांधी निर्विवाद श्रेष्ठ ठरतात. कारण त्यांनी भारताच्या सामाजिक व सार्वजनिक जीवनाला नवी दिशा दिली. राजकीय क्षेत्रामध्ये स्वातंत्र्य चवळीचे यशस्वी संचालन, सामाजिक क्षेत्रामध्ये अस्पृश्यता निवारण व कल्याण, आर्थिक क्षेत्रात ग्रामोद्योगाचे पुनर्जीवन व त्याचा पुरस्कार व जीवनामध्ये नैतिकला दिलेले महत्वपूर्ण स्थान या सर्व क्षेत्रामधील त्यांचे योगदान अविस्मरणीय असेच आहे.

**सूचक शब्द :** अस्पृश्यता निर्मूलन, हिंद स्वराज, सत्य, अहिंसा, –हृदयपरिवर्तन.

**प्रस्तावना**

भारत हा अनेक जाती, धर्म, परंपरा, भाषा, संस्कृती या सर्वामध्ये विविधता असणारा प्रदेश, त्यातच संस्थानिक आणि ब्रिटीश यांची साम्राज्ये. त्यांचे कायदे वेगळे. त्यामुळे समाजाला स्वावलंबी आणि स्वातंत्र्याची जाणिव कशा पद्धतीने करून द्यावी ही एक त्यांच्या समोर मोठी समस्या होती. म्हणूनच गांधीजींनी आपले राजकीय गुरु नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सल्ल्यावरून सर्वप्रथम भारतभर फिरून समाजाची वास्तविक स्थिती समजून घेण्याचा निर्णय घेतला. गांधीना भारतीय समाजातील सामाजिक असमानता साम्राज्यवादी सत्तेप्रमाणेच तिरस्करणीय वाटली.

गांधींनी हिंद स्वराज मध्ये सर्वोदयी समाज व्यवस्थेची कल्पना मांडली होती. सर्वोदयी समाज म्हणजे असा समाज ज्यामध्ये सर्वाचे कल्याण होईल, सर्वजण सुखी होतील, सर्वांना न्याय मिळेल. समाजाच्या प्रगतीमध्ये सर्वजण सहभागी होतील आणि सामाजिक प्रगतीचा लाभ सर्वांना समान रूपाने होईल. वस्तुत: त्यांची ही समाज व्यवस्था आदर्शात्मक व्यवस्था होती. याचे भान त्यांना नक्कीच होते. सर्वोदय समाजाची संकल्पना समाजातील दुर्बल घटकांना दुर्बल ठेऊन, महिलांना त्यांच्या मानवीय अधिकारांपासून वंचित ठेवून, अस्पृश्य व आदिवासी लोकांना समाज व्यवस्थेच्या बाहेर ठेऊन कदापीही साध्य करता येणार नाही. म्हणून त्यांनी सर्व बाबींकडे जाणिवपूर्वक लक्ष देण्याचे कार्य केले. गांधीजींचे अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य हे एका बाजूला अस्पृश्यांच्यासाठी होते तर दुसऱ्या बाजूला सवर्णांच्यामधील जातीय मानसिक बदलासाठी व प्रबोधनासाठी होते. याचे कारण असे की, जातवर्गीय उच्च मानसिकता आणि अस्पृश्यता ही केवळ अस्पृश्यांनी सोडून चालत नाही तर उच्च जातींच्या लोकांनी सोडली पाहिजे. त्यांचा सामाजिक दर्जा व फायदे उच्च जातीचे लोक घेतात त्यामुळे त्यांच्यातील बदल हा महत्त्वपूर्ण ठरतो. महात्मा गांधी हे अशा सवर्ण लोकांच्या जातीय मानसिकते विरुद्ध लढत होते.

**संशोधनाची उदिद्ष्ये**

१. महात्मा गांधीजींच्या अस्पृश्यता निर्मूलन कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहिते**

१. अस्पृश्यता निर्मूलनासाठी सवर्णांच्या मानसिकतेत बदल होत आहे.
२. महात्मा गांधी यांच्या –हृदयपरिवर्तन सिध्दांत भारतीय लोकांनी स्वप्नाळू ठरवला.

**संशोधनाची पद्धती**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये अभ्यासासंदर्भातील वेगवेगळया लेखकांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांचा तसेच इंटरनेट साइटचा समावेश आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंत्र्यात मोलाचे योगदान आहे. त्यांच्या अनेक विस्तृत कार्यापैकी अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेल्या कार्यापुरतेच प्रस्तुत संशोधन मर्यादित आहे.

**सत्याग्रह आश्रमातील अस्पृश्यतेविरुद्ध सत्याग्रह**

'अहिंसा' तत्त्वाचा विकास व्हावा, लोकांना त्याचे महत्त्व समजावे या उद्देश्यानेच गांधींनी भारतात अहमदाबादमध्ये 'सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली होती. सत्याग्रह आश्रमाची स्थापना १५ मे, १९९५ रोजी झाली होती. अस्पृश्तेची प्रथा आश्रमात न पाळण्यासाठी त्यांनी कठोर नियम केले. गांधींच्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या आंदोलनाची महत्वाची बाजू म्हणजे अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करणे, अस्पृश्यांना आपल्या परंपरागत विचार व

जीवनशैलीमध्ये बदल करायला लावणे. ते अस्पृश्यांमधील निरक्षरता, अंधविश्वास व्यसनाधीनता, वाईट प्रथा तसेच शूद्रांमधील अस्पृश्यता संपवण्यावर भर दिला.

**मंदिर प्रवेश आंदोलन**

मंदिरात प्रवेश करणे वा न करणे हा अस्पृश्यांचा प्रश्न आहे मंदिरांची दारे उघडणे हे मात्र कर्तव्य आहे त्यांच्यादृष्टीने धर्मसुधारणा झाल्यास अस्पृश्यांचा ऐहिक दर्जा आपोआपच वाढेल. याउलट ऐहिक दर्जा कितीही वाढला तरी त्यामुळे त्यांच्या धार्मिक व सामाजिक दर्जात फरक होणार नाही. निदान मंदिर प्रवेशामुळे इतर सुधारणेच्या बाबी कमी अवघड होतील असे गांधींचे मत होते. अस्पृश्यांना हळूहळू सामाजिक दर्जा प्राप्त होईल असे त्यांना वाटत होते. अस्पृश्यता निर्मूलनासाठी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाला त्यांनी सर्वाधिक महत्त्व दिले. त्यांचा असा विश्वास होता की, अस्पृश्यांमध्ये आत्मसन्मानाचा भाव निर्माण करण्यासाठी आणि सवर्ण हिंदूंचा दृष्टीकोण बदलण्यासाठी मंदिर प्रवेशासारखा दुसरा चांगला उपाय नाही. त्यांनी सवर्ण हिंदूंना आवाहन केले की, अस्पृश्य मुलांना आपल्या कुटुंबामध्ये सामावून घ्या आणि आपल्या मुलांप्रमाणे त्यांचे पालन- पोषण करा. तसेच अस्पृश्यांनी मांसाहार, व्यसनाधीनता, दुष्ट व्यवसाय यांपासून लांब राहून शिक्षण घ्यावे, स्वच्छतेचे पालन करावे असा उपदेश दिला.

**गुरुवायूर आणि वायकोम मंदिर सत्याग्रह**

अस्पृश्यांना मंदिर प्रवेश करू देण्यासंदर्भात हिंदूंचे मत परिपक्क झाल्याशिवाय अशी चळवळ हाती घेता येणार नाही. सवर्ण हिंदूंची सकारात्मक मानसिकता असूनही त्यात काही कायदेशीर अडचणी जर येत असतील तर त्या दूर करणे गरजेचे आहे. अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाचे प्रायोजित विधेयक केंद्रीय कायदेमंडळात पारित झाल्यानंतर अशा अडचणी दूर होतील, असा खुलासा गांधीजींनी केला. गांधीजींनी गुरुवायूर येथील अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी दोन गोष्टी आवश्यक मानल्या. मंदिरात जाणाऱ्या हिंदूंचे सार्वमत आणि कायदेशीर अडथळा दूर करण्यासाठी व्हाइसरॉय यांच्या संमतीचा कायदा. यासाठीचे सार्वत्रिक मतदान होऊन बहुसंख्याक हिंदूंनी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशास होकार दिला.

**'हरिजन' साप्ताहिक गांधींच्या विचारांचे नवे मुखपत्र**

गांधीजींनी आपले विचार व मते लोकांपर्यंत पोहचवावीत, राष्ट्रीय चळवळ आणि सामाजिक चळवळ यासंबंधी लोकांमध्ये जागृती घडून आणावी, शिक्षणाचे महत्त्व लोकांना पटावे यासाठी वृत्तपत्रांची निर्मिती केली. गांधीजी ज्यावेळी तुरुंगात होते त्यावेळी गुजरातीधून 'हरिजन बंधू', इंग्रजीत 'हरिजन' आणि हिंदीमध्ये 'हरिजन सेवक' ही साप्ताहिके सुरु केले. एकेकाळी 'नवजीवन' व 'यंग इंडिया' मार्फत जसे लोकशिक्षण दिले जात होते तसेच या साप्ताहिकांमार्फत दिले जात होते.

**हरिजन सेवक संघ**

पुणे करारानंतर अस्पृश्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सतत कार्य करणारी संस्था असावी या हेतूने ३०/९/१९३२ ला मुंबईतील कावसजी जहांगीर हॉलमध्ये जाहीर सभा भरविण्यात आली. इथेच 'ऑल इंडिया अँटि-अन्ट्चबिलिटी लीग (अखिल भारतीय अस्पृश्यता विरोधक संघां) ची स्थापना करण्यात आली. या संपाची उदिष्ट्ये १) अस्पृश्यताविरोधी सतत प्रचार करणे. २) सार्वजनिक विहरी, धर्मशाळा, रस्ते, शाळा, स्मशानभूमी व सार्वजनिक देवालये ही सर्व ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली करण्याकरिता लवकर निश्चित पावले उचलणे हे होते.

**अस्पृश्यतेविरुद्ध उपोषण**

गांधींनी सत्याग्रहाची मागणी करताना अनेका वेळा उपवास केले. ते या उपवासाचा वापर अनेक प्रकारे करत असत. १९३२ आणि १९३३ साली केलेले दोन उपवास हे थेट अस्पृश्यांच्या संबंधी होते. परंतु दोन्ही उपवासांच्या ध्येय, उद्दीष्ट आणि भावना यांच्यामध्ये अंतर होते. १९३२ साली अस्पृशाना विभक्त मतदार संघ असू नयेत म्हणून पुणे येथील

येरवडा तुरुंगात २१ दिवसांचा उपवास केला. दि. ८ मे, १९३३ रोजी अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशासाठी त्यांच्या उद्धारासाठी आपण उपवास करत आहोत असे त्यांनी जाहीर केले आणि विनाशर्त दुपारी १२.०० वाजता २१ दिवसांचा उपवास केला. हा उपवास करण्याचा सल्ला आंतरात्म्याने दिला असल्याचे त्यांनी जाहीर केले.

**आंतरजातीय विवाहांनाच उपस्थित राहण्याचा निर्णय**

अस्पृश्यतेच्या विरोधात काम करताना गांधी सतत बदलत गेले. ते अधिकाधिक कठोर निर्णय घ्यायला लागले. “त्यांनी १९४६ सालच्या एप्रिल महिन्यात एक नवीन निर्णय पत्राच्या माध्यमातून जाहीर केला. लग्नातील एक पक्ष हरिजन असेल, तरच त्या लग्नाला उपस्थित आणि आशीर्वाद देण्याचा निर्णय गांधींनी घेतला. १४ वा निर्णयाने गांधीनी जातीयतेविरुद्ध स्पष्ट भूमिका घेतली होती आणि ती आंतरजातीय विवाहांना मान्यता देणारी ठरली होती

**अस्पृश्यता निर्मूलन**

गांधीजी आपल्या काळातील एक थोर आदर्शवादी व्यक्ती म्हणून ओळखले जातात.. आदर्शवादाच्या सर्व मूलभूत तत्त्वांवर त्यांचा विश्वास होता. या तत्वांशी ते जीवनभर प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करत होते. मानवी मन आणि मानवी चारित्र्याचे चांगुलपण अन शुद्धता यावर त्यांची दृढ श्रद्धा असून मानवी मनात निश्चितपणे परिवर्तन घडवून आणले जाऊ शकते, अशी त्यांची खात्री पटली होती. मनुष्य मूलतः स्वभावाने दयाळू प्रेमळ आणि प्रेम करण्याजोगा प्राणी आहे. फसवणूक, स्वार्थीपणा, क्रौर्य, हिंसा इ. सारख्या माणसाला जडलेल्या व्याधी या त्याच्यावर झालेल्या बाह्य संस्कारातून आणि त्याच्या सभोवतालच्या सामाजिक पर्यावरणातून, आदर्शवादाच्या अभावामुळे आणि चुकीच्या शिकवणुकीमुळे आल्या आहेत. माणसातील हे सर्व दुर्गुण, त्याची योग्य काळजी घेऊन, उपदेश करून आणि त्याच्यापुढे आदर्शवाद ठेवून घालवले जाणे शक्य असल्याचे गांधीजींचे मत होते. याच गृहितकावर गांधीजीनी आपल्या कार्याची दिशा ठरवलेली दिसते.

अस्पृश्योद्धाराच्या गांधीजींच्या योजनेत पारित केलेल्या जाणाऱ्या कायद्यांना किंवा त्यासाठी अस्पृश्यांनी स्वतःहून केलेल्या सत्याग्रहासाठी स्थान नाही. सवर्ण हिंदुच्या हृदयात परिवर्तन होऊन जोपर्यंत ते अस्पृश्यांच्या जन्मसिद्ध हक्कास मान्यता देत नाहीत, तोपर्यंत संयम ठेवून अस्पृश्यांनी प्रतीक्षा करण्याचे आवाहन गांधीजी करतात. ते म्हणतात, “तुम्ही आणि मी संयमित युक्तिवाद आणि योग्य वर्तन या एकमात्र मार्गाने जीर्णमतवादी सवर्ण हिंदुची त्यांच्या धर्मांधतेतून सुटका करू शकतो. त्यांच्यात परिवर्तन होईपर्यंत तुम्ही जास्तीत जास्त संयम ठेवण्याचीच विनंती मी तुम्हास करू शकतो. गांधीजींच्या मते, संपूर्ण समाजजीवन आणि सवर्ण हिंदूंची मानसिकता अस्पृश्यतेच्या व्रणाने व्यापली आहे. अस्पृश्यता निर्मूलनासाठी सार्वजनिक भोजन आणि विवाहासारखे मार्गही निरुपयोगी आहेत. हे मार्ग अनावश्यक असले तरी त्यांचा अवलंब व्यक्तिगत पातळीवर केला जाऊ शकतो. परंतु त्यासाठी सक्ती केली जाऊ नये, असे गांधीजींना वाटते. तथापि, आयुष्याच्या उत्तरार्धात आंतरजातीय भोजन आणि आंतरजातीय विवाहांची उपयुक्तता त्यांना पटल्याने त्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिल्याचे दिसते. ते म्हणतात, जी मुले किंवा मुली यांची लग्न करण्याची इच्छा आहे, त्यांच्यापैकी एक पक्ष हरिजन असल्याशिवाय ते सेवाग्राम आश्रमात विवाहबद्ध होऊ शकत नाहीत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे गांधीजींचे स्वप्न लक्षात ठेवण्यासारखे आहे. ते म्हणतात, "जेव्हा अस्पृश्यता नष्ट होईल, तेव्हा भेदाभेद नष्ट होईल आणि कुणीही स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजणार नाही. अनुसूचित वर्ग नाहीत कायद्याच्या दृष्टीने जात वर्ग नाहीत. सर्व हिंदू एक आहेत. कुणीही उच्च नाही, कुणीही नीच नाही, उपेक्षित अनुसूचित वर्गांना शिक्षण, गृह इ. संदर्भात विशेष वागणूक दिली जाईल.

**निष्कर्ष**

१. अस्पृश्यता निर्मूलनासाठी सवर्णांच्या मानसिकतेत हळूहळू बदल होत आहे.

२. महात्मा गांधी यांच्या –हृदयपरिवर्तनाचा सिध्दांत भारतीय लोकांनी स्वप्नाळू ठरवला असला तरीही महात्मा गांधींच्या सत्य व अहिंसा तत्वज्ञानाच्या परिणामामुळे –हृदयपरिवर्तन हळुवारपने होत आहे जसे कि विनोबा भावेंची भूदान चळवळ.

**संदर्भ सूची**

१. वियोगी हरी, १९८९, 'बापू की ऐतिहासिक यात्रा', प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली, पृ. १३.

२. गांधी राजमोहन, २०१३, 'मोहनदास मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, पृ. ४२३.

३. निकम श्रीराम, २००८, गांधी-आंबेडकर अस्पृश्यमुक्ती संघर्ष' लोकवा गृह, पू. १४५.

४. आंबेडकर (डॉ.) बी. आर. कॉंग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांप्रति काय केले?", क्षितिज " पब्लिकेशन्स, नागपूर, २०१४, पू. ३९.

५. बंग अभय, गांधींसोबत (लेख) साप्ताहिक साधना, शनिवार, ४ नोव्हेंबर २०१५, पृ. २८.

६. गांधी राजमोहन, २०१३, 'मोहनदास', मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, पृ. ६९२.

७. रॉय अरुंधती, २०१६, वंश, जात व जातिव्यवस्थेचे उच्चाटन',' अवधूत डोंगरे, सुगावा प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर, पृ. २८.

८. नलिनी पंडित २००६ 'गांधी' ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. पू. १३५. १२१ निकम श्रीराम, २००८, गांधी-आंबेडकर अस्पृश्यमुक्ती संघर्ष, लोकवाक्यगृह. पू. ४९.